महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत विद्युत निरीक्षक गट- अ (राजपत्रित) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक: मुविनि-२०१६/प्र.क्र.९४ /उर्जा-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० नोव्हेंबर, २०१७.

संदर्भ:- (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. ७४४ (५) १४९४९/पंधरा दि.१८/११/२०१५.
(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.५२२/ऊर्जा-२, दि. २६/०२/२०१५
(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.५२२/ऊर्जा-२, दि. २४/०४/२०१५.
(४) सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१३/प्र.क्र.५३/सेवा-२ दि. १७/०२/२०१७
(५) सामान्य प्रशासन विभाग यांची अधिसूचना दि. १५ जून, २०१७.
(६) मुख्य विद्युत निरीक्षक , मुंबई यांचे पत्र क्रं. मुविनि/१२८७/२०१५ दि. ०९/११/२०१५.

शासन निर्णय :-

शासन निर्णय दि. २६/०२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये विद्युत निरीक्षणालयाचे संपूर्ण कामकाज आस्थापनेसह ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली आणण्यात आले आहे. यापूर्वी ऊर्जा विभागांतर्गत विद्युत निरीक्षणालयाच्या पदांवरील अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्त्या, बदल्या, पदोन्नत्या, सेवाज्येष्ठता इत्यादी सर्व आस्थपनाविषयक बाबी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हाताळल्या जात होत्या. परंतु आता संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये या सर्व बाबी ऊर्जा विभागाच्या अखत्यारीत आल्या आहेत. त्यामुळे आता दि. २०.०२.२००६ च्या शासन निर्णयान्वये विद्युत निरीक्षणालय शाखेसाठी पदांचा जो आकृतिबंध मंजूर करण्यात आला होता तो संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये अस्तित्वात आला असून तो ऊर्जा विभागाच्या आस्थापनेवर यापुढे कार्यरत राहणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सन २०१३ मध्ये कार्यकारी अभियंता (विद्युत)/ विद्युत निरीक्षक पदाकरिता मागणीपत्र पाठविण्यात आले होते. त्यानुषंगाने, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांच्या संदर्भ क्र. १ येथील पत्रान्वये महाराष्ट्र अभियांत्रिक सेवा परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे ८ उमेदवारांची शिफारस केली असून त्यापैकी ६ उमेदवारांना ऊर्जा विभागांतर्गत विद्युत निरीक्षक या पदावर सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संदर्भ क्र. ४ येथील दि. १७/०२/२०१७ च्या पत्रान्वये प्रस्ताव ऊर्जा विभागास पाठविण्यात आला. त्यानुसार खालील ६ उमेदवारांची त्यांच्या नावासमोर रकाना क्र. ७ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी विद्युत निरीक्षक, गट-अ (राजपत्रित) या पदावर वेतन बँड रू. १५६००-३९१०० ग्रेड पे.

६६०० या वेतन संरचनेत ते ज्या दिनांकास त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून दोन वर्षांच्या परिविक्षा कालावधीसाठी तात्पुरती नियुक्ती करण्यात येत आहे.

गुण क्र.	महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा गुणवत्ता क्र.	महा. लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवाराचे नाव	वर्गवारी	आयोगाने शिफारस केलेली वर्गवारी	दि.१५ जून, २०१७ च्या अधिसुचनेनुसार वाटप केलेला महसुली विभाग	नियुक्तीचे ठिकाण
१	२	३	४	५	६	७
१.	१	नाईक सारंग सुभाष	भ.ज. (ब)	भ.ज. (ब)	अमरावती	विद्युत निरीक्षक, वाशीम
२	२	मदाने निलेश वामन	खुला	खुला	औरंगाबाद	विद्युत निरीक्षक, हिंगोली
३	३	जाधव नवनाथ बाजीराव	भ. ज. (क)	भ. ज. (क)	औरंगाबाद	विद्युत निरीक्षक, उस्मानाबाद
४	४	कुऱ्हाडे मिलिंद संतोषराव	अ.जा.	अ.जा.	औरंगाबाद	विद्युत निरीक्षक, जालना
५	५	आंबेकर संजय आदिनाथ	इ.मा.व.	इ.मा.व.	अमरावती	विद्युत निरीक्षक, बुलढाणा
६	७	वनारकर अविनाश दिपचंद	खुला	खुला	नागपूर	विद्युत निरीक्षक, वर्धा

०२. उपरोक्त उमेदवारास संबंधित वैद्यकीय मंडळाने वैद्यकीयदृष्टया शासकीय सेवेसाठी पात्र ठरविले आहे. तशी नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

०३. उपरोक्त उमेदवाराची चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाला असून चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणी समाधानकारक असल्याचे निर्दशनास आले आहे. तशी नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

०४. उपरोक्त उमेदवाराची विद्युत निरीक्षक, गट- अ या पदावर ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून, नामनिर्देशनाने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे:-

१) सदर उमेदवारास प्रथम वेतनवाढ परिविक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.

२) सदर उमेदवाराचे परिविक्षा कालावधीतील काम किंवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाची नसल्यास अथवा असमाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल अथवा सेवेतून कमी करण्यास ते पात्र ठरतील.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि. ०७/०८/२००१ अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरिता संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/ प्र.क्र.६१/२००१/३९, दि. १९/०३/२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ०२ वर्षाच्या आत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहित मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही, तर उक्त कालावधी संपताच सदर पदावरील त्यांच्या सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येतील.

४) शिफारसपात्र मागासवर्गीय उमेदवाराचे जाती विषयक दावे संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून/संबंधित प्राधिकाऱ्याकडून तपासून घेण्यात यावेत.

५) सदर उमेदवाराची नियुक्ती सरळसेवा प्रवेश नियुक्तीसाठी विहित केलेल्या नियमांच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळाली नसल्यास त्या परिक्षा त्यांना विहित मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

६) सदर उमेदवाराचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन), नियम-१९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात यावे.

७) सदर उमेदवारांपैकी जे उमेदवार सध्या शासन सेवेत कार्यरत आहेत त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी संबंधित उमेदवारांना नवीन ठिकाणी रुजू होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच जे उमेदवार निमशासकीय सेवेत/महामंडळात कार्यरत आहेत त्यांनी त्यांच्या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी/ शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु नसल्याबाबतचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करावे.

८) उपरोक्त उमेदवारांना नियुक्तीनंतर शासन सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही १०९२/ १०३३/ प्र.क्र.३३/ ९२/ आठ, दिनांक ०२.१२.१९९७ मधील तरतुदीनुसार शासनाला किमान एक महिन्याची पूर्वसूचना देणे आवश्यक राहील किंवा पूर्वसूचनेऐवजी त्यांचेकडून एक महिन्याचे वेतन वसूल करण्यात येईल. मात्र गैरशिस्त, सेवानियमांचा भंग इत्यादी कारणांसाठी एखाद्या उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी वरीलप्रमाणे नोटीस देण्याचे बंधन शासनावर राहणार नाही.

९) उपरोक्त उमेदवार ज्या दिवशी रुजू होतील त्या दिवसापासून नियमाप्रमाणे त्यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यात येतील व त्यांची बदली झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावेत.

१०) उपरोक्त उमेदवारास पदावर नेमणूक झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या आत विभागांतर्गत व्यवसायिक परीक्षा उत्त्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

११) उपरोक्त सर्व उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (सेवेच्या सर्वसाधारण अटी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, नियम, शासन निर्णय, परिपत्रक व शुध्दीपत्रकातील सुधारणा/तरतुदी बंधनकारक राहतील.)

१२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४ दि.१८/०८/२००९ मधील तरतुदींनुसार दि. ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्ती वेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याने त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्ती वेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दि. ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल आणि त्याला दि. ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यांनतर नवीन पदावर नियुक्त करण्यात आले असेल अशा प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि. १२ जानेवारी, २००७ प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि.१२ जानेवारी, २००७ मधील (i) ते (ii) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. दि. १८/०८/२००९ च्या परित्रकात नमूद (i) ते(iv) येथील सर्व अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय कर्मचाऱ्यास नवीन राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहतील.

१३) सदर उमेदवाराचे सेवानिवृत्तीचे वय प्रचलित नियमानुसार राहील.

१४) उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

१५) सदर उमेदवाराने नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसूचना देणे अथवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक आहे.

०५. सदर नियुक्ती उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यासत्यतेवर अवलंबून राहील. सदर प्रमाणपत्र नियुक्तीनंतर खोटे अथवा बनावट आढळल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

०६. प्रस्तुत पदाच्या नियुक्ती न्यायालयांमध्ये उमेदवारांकडून दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणांवरील अंतिम आदेशाच्या अधिन राहून आणि मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक ६७९/२०१४ श्री. प्रसन्ना वामन नारखेडे विरुध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

०७. हे आदेश प्राप्त होताच संबंधित उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल संबंधित विभाग प्रमुखाकडे सादर करावा. विभाग प्रमुखांनी त्याबाबतचा अहवाल मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

०८. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१७१११०१६३४००३७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2017.11.10 16:22:25 +05'30'

(भि.य. मंता)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)

२) मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पू.), मुंबई-७१.

३) अधिक्षक अभियंता, विद्युत निरीक्षण मंडळ, औरंगाबाद/नागपूर.

३) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र नागपूर.

४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ निवासी लेखाधिकारी, मुंबई/ नागपूर.

५) जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम, हिंगोली, उस्मानाबाद, जालना, बुलढाणा, वर्धा.

६) उप सचिव (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

७) संबंधित विद्युत निरीक्षक

८) निवड नस्ती-ऊर्जा-५.

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३) मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव

४) प्रधान सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२